# ॥ औदुंबर रसग्रहण ॥

एखाद्या कुशल चित्रकाराने कुंचलीच्या अवघ्या चार-
सहा फटकाऱ्यांसरशी एखादे सुरेख चित्र निर्माण करावे तद्वत अवघ्या आठ ओळीत बालकवींनी एक सुंदर निसर्गचित्र शब्दांच
मोजक्या रंगांनी शब्दांच्या चौकटीत बसविलेले हे एक साधे व जिवंत चित्र आहे. बालकवींची रंगदृष्टी येथे आपल्या प्रत्ययास

पहिल्या चार ओळींत टेकड्या गाव शेतमळे व झरा यांनी व्यापलेले विहंगम दृश्य दिसते.

शेतमळ्यांच्या हिरव्या गरदीतून वाहणाऱ्या निळ्यासावळ्या झऱ्यावरून जी नजर मागे जाते ती चार घ
पुढील दोन ओळीत त्या काळ्या डोहाच्या लाटांवर गोड काळिमा पसरून जळात पाय टाकून बसलेला औदुंबर दाखविला अ

केवळ निसर्गाचे एक सुरम्य चित्र रंगविण्याचा कवीचा हेतू दिसत नाही. पहिल्या चार ओळींतील आनंद

‘

ऐल तटावर पैल तटावर आडवीतिडवी झाकळुनी जळ गोड काळिमा जळात बसला असला औदुंबर’
या गोड शब्दांत सुंदर अनुप्रास साधला आहे. चिमुकले गाव निळासावळा झरा दाट हिरवी गरदी गोड काळिमा आडवीति
चेतनगुणोक्ती’
हा अलंकार साधला आहे. शब्दमाधुर्य व पदलालित्य यांनी ओथंबलेली ही एक प्रासादिक कविता आहे.

---

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated October 4, 1999